# H.S.C. - XII (Science)

## मराठी (युवकभारती)

दि. 21.09.2010

वेळ : 3 तास)　　　　**प्रश्नपत्रिका : सप्टेंबर २०१०**　　　　(एकूण गुण : 80

सूचना : सर्व सूचना प्रश्नपत्रिका मार्च २००८ प्रमाणे.

---

**प्र. १ : खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा.** (१०)

(१) विज्ञान : मानवाचा सखा　(२) निवडणुकांची रणधुमाळी　(३) एका पायवाटेचे मनोगत

(४) शालान्त परीक्षा ऐच्छिक झाल्या तर .....　(५) युवकांहाती मशाल क्रांतीची !

**प्र. २ : खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा.** (८)

(१) 'तरच मल्हारजी होळकरांची सून' या पाठातून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा बाणेदारपणा कसा दिसून येतो ?

(२) गजमल माळी यांनी रॉबर्ट व पारो यांच्या प्रेमकहाणीला अद्‌भुत का म्हटले आहे ?

(३) रजिया पटेल यांच्या अडणघडणीत त्यांच्या वडिलांचा कोणता वाटा आहे ?

**प्र. ३ : खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा.** (८)

(१) प्रीव्ही कौन्सिलमधील खटला हरल्यानंतर लोकमान्य टिळकांनी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली ?

(२) 'ट्रॉयचा घोडा' या पाठात 'पायोनियर-१०' या यानाबद्दल लेखकाने कोणती माहिती सांगितली आहे ?

(३) सासवणे गावातील करमरकर संग्रहालयाला एकदा तरी भेट द्यायला हवी, असे महावीर जोंधळे यांनी का म्हटले आहे ?

(४) डॉ. नरेंद्र जाधव यांनी डॉ. शांती पटेल यांच्या भेटीचे वर्णन कसे केले आहे ?

**प्र. ४ : खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा.** (८)

(१) कवी मुकुंदराज यांनी मराठीची थोरवी कशी गायिली आहे ?

(२) कवी दिलीप चित्रे यांना कोणत्या गोष्टींना मुकावे लागले ? का ?

(३) 'पोरी' या कवितेत स्त्रीमनातील संघर्षाचे चित्रण कवयित्रीने कसे केले आहे ?

**प्र. ५ : खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा.** (४)

(१) संत मुक्ताबाईंनी योगी पुरुषांची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?

(२) 'चाललो' या कवितेत कोणते जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडले आहे ?

(३) आजची मुले खेळपाणी न खेळता 'युद्ध युद्ध' खेळतात, असे कवी वासू वैद्य यांनी का म्हटले आहे ?

**प्र. ६ : (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> गद्य वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा.** (४)

(१) प्रत्येक जननाला मृत्यू वेढूनच बसला आहे.

(२) बिन लग्नाच्या पोरी घरात बसविल्यात ते काय उगाच न्हाई !

(३) बोलाचीच कढी, बोलाचाच भात, जेवोनिया तृप्त कोण झाला ?

**(ख) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.** (४)

(१) हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरी ।
मठाची उठाठेव कां तरी ॥

(२) सूर्यबिंब झाकले ढगांनी झरझरतो पाऊस
किरणांच्या छायेत अनामिक कलावंतूंचे भास

(३) झाडे झाडांसारखी वागतात
माणूस माणसासारखा का वागत नाही ?

**(ग) (१) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा.** (२)

(१) 'डुल्कैलेया बाळकाचा दृष्टांत' या पाठातील सूत्र काय आहे ?　(२) तानूने कोणत्या शाहिराची नक्कल केली ?

(३) जर्मनांचा राष्ट्रीय कार्यक्रम कोणता ?　(४) महात्मा फुले यांचा दुसरा प्राण कोणता होता ?

**(२) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा.** (२)

(१) 'जन्मोजन्मीं' द्यावी तुमची चरणसेवा' असे कोणी कोणास म्हटले आहे ?

(२) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे पूर्ण नाव लिहा.

(३) भांडवली वृत्तीमुळे कामगारांच्या हाती काय येते ?

(४) कवी नामदेव ढसाळ यांच्या मते, देश, गाव, शहर कशात बुडाले आहे ?

प्र. ७ : (क) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा. (

(१) 'त्याग' या कथेच्या नायिकेच्या मनाची उलघाल लेखिकेने कशी चित्रित केली आहे ?

(२) 'ऊन' या कथेतील पिराजीला शहरातले जीवन नकोसे का वाटत होते ?

(३) 'तिची वाटच वेगळी' या कथेत चंद्रकलेची व्यक्तिरेखा कशी रेखाटली आहे ?

(ख) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा. (

(१) नर्मदा आपल्या मुलांविषयी समाधानी का नव्हती ?

(२) 'सोन्याचा तुकडा' या कथेच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

(३) बसच्या प्रवासात भेटलेल्या बुवाला 'स्पर्श' कथेच्या नायिकेने कोणता उपदेश केला ?

प्र. ८ : (१) खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा. (

(१) श्लेष (२) व्यतिरेक

(२) कंसातील सूचनेनुसार कोणत्याही दोन वाक्यांचे रूपांतर करा. (

(१) वाळलेल्या पाचोळ्यावरून वाऱ्याची पावलं फिरली की त्यातूनही नाद उमटतात. (केवल वाक्य करा.)

(२) आपण अंतराळातच रिमोट कंट्रोलने हे यान उघडू आणि त्यावर मँटरचा वर्षाव करू. (वाक्यप्रकार ओळखा.)

(३) भटक्या-विमुक्तांच्या पुनर्वसनाचे महाराजांनी केलेले प्रयत्न खरोखरच अलौकिक स्वरूपाचे आहेत. (मिश्र वाक्य कर

(३) खालीलपैकी कोणत्याही चार पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा. (

(१) Accountant (२) Circular (३) Estimate (४) Lawyer (५) Organisation (६) Waiting lis

(४) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा. (

(१) रस्तातली एकदोन बोरिची झाडे त्याने कुन्हाडीने छाटली. (२) सर्व प्रेशित देवाकडुन आले. किंवा

खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यात किंवा योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.

(१) फुलांचे शास्त्र आम्ही शिकू पण फुलांचे अगम्य काव्य (२) डँडी ट्रोजन हॉर्स म्हणजे काय

(५) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वतःच्या वाक्यांत उपयोग करा : (

(१) रंगाच्या मोटा बांधणे. (२) मुकाबला करणे. (३) नाळ गाडली जाणे. (४) जीवावर उठणे.

प्र. ९. (क) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा. (

(१) स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरवठा व्हावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यास पत्र लिहा.

(२) 'गरीब विद्यार्थी सहाय्य निधी'तून आर्थिक मदत मिळण्यासाठी तुमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पत्र लिहा.

(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : (

निसर्ग आणि मानव यांच्यातील सौंदर्य काव्यदृष्टीने ओळखण्याची कला लेखकाच्या अंगी असावी. मानवी मनाची प्रगती ही बुद्धिविकासाकडे वाटचाल करीत असते, याचेही भान लेखकाने ठेवावे. वाङ्मय व जीवन यांच्या दरम्यान कधीकधी रम्यता, तर कधीकधी सांकेतिकता या गोष्टी एक भिंत किंवा पडदा निर्माण करतात. हा अडथळा दूर करण्याचे सामर्थ्य लेखकात हवे. सौंदर्यदृष्टी, विनोदबुद्धी, व्यापक सहानुभूती या साधनांनी हे अडथळे दूर होऊ शकतील. कलेचा उग गरजेत नसावा, तो आत्मप्रकटीकरणात व्हावा व ती कला शेवटी मानवी जीवनाच्या उदात्त ध्येयाशी एकरूप व्हावी. अभिव्यक्तीच उत्कट इच्छा व सर्वस्पर्शित्व असेल तर लेखनाचा दर्जा उंचावतो. ललितलेखक नेहमी एकच धर्म मानतो; तो म्हणजे मानवधर्म

(वि. स. खांडेकर - ओळख व अभ्यास : वा. शि. आपटे

प्रश्न :

(१) लेखकाच्या अंगी कोणती कला असावी ? (२) वाङ्मय व जीवन यांच्या दरम्यानचे अडथळे कसे दूर होऊ शकतील ?

(३) ललितलेखक कोणता धर्म मानतो ? किंवा

वरील गद्य-उताऱ्याचा सुमारे एक तृतीयांश (१/३) एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(ग) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निमंत्रणपत्रिका लिहा. (

(१) आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ.

(२) तुमच्या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन. किंवा

खालीलपैकी कोणत्याही एक विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा.

(१) तुमच्या महाविद्यालयातील वृक्षदिंडी. (२) महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचा उद्घाटन समारंभ.

किंवा

खालील विषयावर वृत्तान्त लिहा. (४)

तमच्या महाविद्यालयात पार पडलेला स्वच्छता सप्ताह.